महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125
epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ९० किंमत : ५ रु. | पाने ४

**दिन विशेष...**

१८९७ : डॉ.झाकीर हुसेन यांचा जन्मदिन.
१८९९ : गणेश द्रविड यांना फितुरीबद्दल मृत्युदंडाची शिक्षा दिली.
१९०७ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक गोळवलकर गुरुंजींचा जन्म.
१९२० : हिंदुस्थानी थोर गायक बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे निधन.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ८३,५८०.४० | + २६६.४७ (०.३२%) |
| डॉलर | ₹ ९०.५८ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १४ |
| दिल्ली | २३ | ११ |
| मुंबई | ३५ | २० |
| नागपूर | ३० | १४ |
| पुणे | ३३ | ११ |

**सुविचार**

जीवन ही एक कविता आहे; प्रत्येक क्षणाला एक सुंदर ओळ मानून जगा.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-७:०२ संध्या-६:२२

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५९,१९५/- २,८५,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणाचा निर्णय सुनेत्रा पवार घेणार का?

**● हसन मुश्रीफांच्या विधानावर सुनील तटकरेंचे स्पष्टीकरण**

वृत्तसंस्था । मुंबई

**अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस विलिनीकरणाची चर्चा जोरात सुरू आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून यासाठी पुढाकार घेण्यात आला. मात्र, अजित पवारांच्या राष्ट्रवादीमधील नेत्यांमध्ये काहीसा संभ्रम असल्याचे दिसून येत आहे. यातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन्ही गट यांचे विलीनीकरण होणार की नाही? हा मुद्दा कळीचा बनला आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाकडून विलिनीकरणाबाबत वेगवेगळे दावे-प्रतिदावे करण्यात येत आहेत. आमदार रोहित पवार यांनी १२ फेब्रुवारीला या पत्रकार परिषद घेऊन विलिनीकरणाबाबत काय बोलणी झाली, तसेच इतर माहिती देणार आहेत. यादरम्यान आज राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते हसन मुश्रीफ यांनीही महत्त्वाचे विधान केले आहे. सुनेत्रा पवार यांनी विलीनीकरणाचा निर्णय घेतला तर आम्हाला विलीनकरण करावेच लागेल, असेही हसन मुश्रीफ म्हणाले आहेत.


यावर आता राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सुनील तटकरे म्हणाले की, हसन मुश्रीफ जरूर पक्षाचे वरिष्ठ नेते आहेत. आम्ही सर्वांनी अजितदादांच्या नेतृत्वाखाली एनडीएमध्ये जाण्याचा निर्णय घेतलेला आहे. शेवटी या विषयाची चर्चा आम्ही सखोलपणाने करू. तसेच १० तारखेला मुंबई येथे मंत्रिमंडळाची बैठक आहे. त्यावेळी उपमुख्यमंत्री म्हणून वहिनी (सुनेत्रा पवार) तेथे येतील, तेव्हा या विषयावर नक्कीच चर्चा करू.

कदाचित मग त्या दिल्लीतही येऊ शकतील. राष्ट्रपती महोदयांची भेट, पंतप्रधानांची भेट, राज्यसभेच्या त्या सदस्या आहेत, त्या संदर्भातील ज्या संवैधानिक जबाबदाऱ्या आहेत. आम्ही योग्य वेळेला बसून त्याबद्दल निर्णय करू,असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, अजितदादांच शेवटचं स्वप्न पूर्ण होईल आणि जिल्हा परिषदेत जास्तीत जास्त सदस्य निवडून येतील, असा विश्वास आ.रोहित पवार यांनी व्यक्त केला आहे.

● विलिनीकरणाबाबतचा सुनेत्रा पवार निर्णय घेतील का? त्यांच्याकडे ही सर्व निर्णय प्रक्रिया असणार आहे का? की तुमच्या पक्षाच्या कोअर कमिटीमध्ये विलिनीकरणाबाबत पुन्हा चर्चा होईल? असा प्रश्न सुनील तटकरे यांना प्रश्न विचारण्यात आला. याबद्दल बोलताना सुनील तटकरे म्हणाले की, आम्ही २०२३ ला निर्णय घेतला तो आम्ही एकत्र बसून घेतला. वहिनी आमच्या विधिमंडळ पक्षाच्या आणि पक्षाच्या नेत्या आहेत. त्यामुळे त्या संदर्भात एकत्र बसून आम्ही निर्णय घेऊ. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा दादांचा राजकीय परिवार आहे. जो नेटाने, आत्मविश्वासाने, कणखरपणाने राजकीय इच्छाशक्ती ही दादांनी लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर ज्या पद्धतीने दाखवली दाखवली आणि राज्यातील १३ कोटी जनतेने आम्हाला ७३ टक्के स्ट्राईक रेट देत आम्हाला विजयी केलं. त्यामुळे स्वभाविकपणे आम्ही या संदर्भातील निर्णय योग्यपणाने घेऊ.

## पीओकेवरून पाकिस्तानला मोठा धक्का

### अमेरिकेनेही भारताचाच भाग असल्याचे केले मान्य




वृत्तसंस्था । वाशिंगटन

**भारतासोबतच्या अमेरिकेच्या व्यापार करारावर पाकिस्तान आधीच नाराज होता. आता, पाकव्याप्त काश्मीरबाबत अमेरिकेने पाकिस्तानला मोठा धक्का दिला आहे. अमेरिकेने एक नकाशा जारी केला आहे ज्यामध्ये भारताच्या नकाशात समाविष्ट आहे.**

भारत आणि अमेरिकेमध्ये व्यापार करार झाला आहे. अमेरिकन व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने इंस्टाग्रामवर एक पोस्ट पोस्ट केली आहे. ज्यामध्ये म्हटले आहे की अमेरिका-भारत करारामुळे अमेरिकन उत्पादनांसाठी नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळेल, ज्यामध्ये झाडांच्या काजू आणि सुक्या धान्यांपासून ते लाल ज्वारी आणि ताजी आणि प्रक्रिया केलेली फळे यांचा समावेश असेल. सर्वात उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे भारताचा नकाशा असलेली पोस्ट. भारताचा जुनानकाशा, ज्यामध्ये हा भारताचा भाग आहे. (पान २ वर)

## थोडक्यात

### आंतरराष्ट्रीय तेल तस्करी रॅकेटचा पर्दाफाश

**मुंबई ।** भारतीय तटरक्षक दलानं मुंबईजवळ समुद्रात मोठी कारवाई केली आहे. तेलाची तस्करी करणारी तीन जहाजं तटरक्षक दलानं पकडली आहेत. या जहाजांमध्ये मोठ्या प्रमाणात तेल साठा होता. ही परदेशी जहाजं समुद्रात तेलाची तस्करी करत होती. शुक्रवारी एका जटिल समुद्र-हवाई नेटवर्कवर आधारित ऑपरेशनच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय तेल तस्करी रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. रॅकेटचा भाग असलेल्या जहाजांनी संघर्षग्रस्त देशांमधून मोठ्या प्रमाणात स्वस्त तेल आणि तेल आधारित वस्तूंची तस्करी करुन आर्थिक फायदा कमावण्याचा मार्ग निवडला होता. ही जहाजं आंतरराष्ट्रीय समुद्रात वस्तूंची देवाणघेवाण करायची. या सिंडिकेटमध्ये काम करणारे हस्तक अनेक देशांमध्ये सक्रिय आहेत. जहाजं खोल समुद्रात असताना त्यांच्यात समन्वय राखण्याचं काम हस्तकांकडून केलं जातं.

### मुंबईतील शिक्षिकेचा ९ कोटींचा सन्मान

**दुबई ।** एका मुंबईतील शिक्षिकेचा आंतरराष्ट्रीय पातळीवरील सन्मान करण्यात आला आहे. झोपडपट्ट्यांमध्ये जात मुलांना शिकवण्याचा ध्यास घेतलेल्या रूबल नागी या जेम्स एज्युकेशन ग्लोबल टीचर पुरस्काराच्या त्या विजेत्या ठरल्या आहेत. या अंतर्गत त्यांना १० लाख अमेरिकन डॉलर्स देण्यात आले आहेत. रुबल नागी यांची निवड ही १३९ देशांतील ५००० शिक्षकांमधून करण्यात आली आहे. विश्व सरकार शिखर संमेलनाच्या शेवटच्या दिवशी ही निवड करण्यात आली आहे. दुबईचे क्राउन प्रिन्स शेख हमदान बिन मोहम्मद बिन राशिद अल मकतूम यांनी जीईएमएस एज्युकेशनचे संस्थापक सनी वर्गी यांनी हा पुरस्कार दिला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर रूबल नागी या भावुक झाल्या होत्या.

# मुंबई महापौरपदासाठी भाजपकडून रितू तावडे

## ...तर उपमहापौरपदासाठी शिवसेनेकडून संजय घाडी

वृत्तसंस्था । मुंबई

**भाजपने मुंबईच्या महापौर पदासाठी रितू तावडेंच्या नावाची घोषणा केली आहे. मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली असून, शिवसेनेकडून उपमहापौर पदासाठी संजय घाडी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून महापौर आणि उपमहापौर पदावरून जोरदार रस्खीखेचनंतर भाजप आणि शिवसेनेकडून मोठी घोषणा करण्यात आली आहे.**



मुंबई महापालिकेचे महापौर पद सर्वसाधरण महिलेसाठी राखीव करण्यात आले होते. भाजपकडून अनेक इच्छुक महिला नगसेवकांची नावे चर्चेत होती. अखेर दोन टर्म नगरसेविका असलेल्या रितू तावडे यांना भाजपकडून महापौर पदासाठी संधी देण्यात आली आहे. उपमहापौर पद हे शिवसेनेला देण्यात येणार असे सांगितले जात होते. अगदी तसेच झाले असून, मुंबईच्या उपमहापौरपदासाठी शिवसेनेकडून (पान २ वर)

### ➢ मुंबईच्या भल्यासाठी आम्ही कटिबद्ध - किशोरी पेडणेकर

आम्हाला आकड्यांची गणितं मान्य असतात आणि यावेळीही ती मान्य केलेली आहेत. पण आम्ही सक्षम विरोधीपक्ष नेता म्हणून.. जसं सत्तेत असतानाही पूर्वी आम्हाला विरोधी पक्षाच्या भूमिका बजावाव्या लागल्या आहेत, तशी आताही ती भूमिका पद्धतशीर, नीटनेटकी, कुठल्याही दबावाला किंवा आमिषाला बळी न पडता, प्रत्येक नगरसेवक आपल्या प्रभागातील प्रश्न मांडतील, मुंबईच्या भल्यासाठी जे जे आहे, ते ते करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे माजी महापौर आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी सांगितलं.

# राज्यात ६० हून अधिक ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड

## मतदारांना फटका

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडली. लोकशाहीच्या या उत्सवात नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला असला, तरी अनेक ठिकाणी निवडणूक यंत्रणेच्या ढिसाळ नियोजनाचा फटका मतदारांना बसला.**

राज्यभरात ६० हून अधिक मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याच्या तक्रारी समोर आल्याने निवडणूक प्रशासनाच्या सज्जतेवर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. निवडणूक प्रक्रियेत सर्वाधिक अडथळे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यात पाहायला मिळाले. तालुक्यातील सुमारे ४० ते ४५ केंद्रांवर मतदान (पान २ वर)

# शेतकरी कर्जमाफीबद्दल कृषीमंत्र्यांची मोठी घोषणा

**● आमचं सरकार नक्की शब्द पाळेल : कृषीमंत्री दत्तात्र्य भरणे**

वृत्तसंस्था । पुणे

शेतकरी कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी आधीच निर्णय घेतलेला आहे. सध्या माहिती संकलनाचे काम सुरू असून, एप्रिलपूर्वी माहिती उपलब्ध होणार आहे.

परदेशी साहेबांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात अहवाल येईल. ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय होईल, असं कृषीमंत्री दत्तात्र्य भरणे यांनी सांगितलं आहे.

भरणे म्हणाले, सुनेत्रा पवार यांनी राज्य, देश आणि पक्षाची जबाबदारी सांभाळावी. याबाबत कोणताही निर्णय घाईघाईने न घेता सर्वांच्या भावना ऐकून योग्य तो निर्णय घेतला जाईल. दरम्यान, मुख्यमंत्री राज्याचे प्रमुख आहेत. अजित पवार (पान २ वर)

### पैसे वाटा, निवडणूक जिंका हाच सत्ताधाऱ्यांचा धंदा : वडेट्टीवार बरसले

वृत्तसंस्था । नागपूर



काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषद घेत सत्ताधाऱ्यांवर टीका केली. चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसचा महापौर बसणार असल्याचं वडेट्टीवारांनी स्पष्ट केलं. पैसे वाटा, निवडणूक जिंका हाच सत्ताधाऱ्यांचा धंदा असल्याची टीका वडेट्टीवारांनी केली. बेताल वक्तव्य करणाऱ्यांवर मुख्यमंत्र्यांनी बडगा उगारावा असेही वडेट्टीवार म्हणाले.

# आ.खडसेंना कोर्टाचा दणका; पत्नीविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी

वृत्तसंस्था । मुंबई

**भोसरी जमीन व्यवहार प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथराव खडसे यांना मोठा न्यायालयीन धक्का बसला आहे. आ. खडसे यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे यांच्याविरोधात मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एमपीएमएलए न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. तसेच, आ.एकनाथराव खडसे यांच्याविरोधातही कोर्टाने कठोर भूमिका घेतली आहे.**



शुक्रवारी या प्रकरणात आरोप निश्चिती होणार होती. मात्र, एकनाथ खडसे आणि मंदाकिनी खडसे दोघेही न्यायालयात हजर राहिले नाहीत. याच कारणामुळे विशेष न्यायालयाने थेट नॉन-बेलेबल वॉरंट जारी केल्याची माहिती समोर आली आहे. आ.खडसे हे महसूलमंत्री असताना, पुण्यातील भोसरी औद्योगिक वसाहतीमधील भूखंड नियमांचे उल्लंघन करून त्यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांनी खरेदी केल्याचा आरोप आहे. ही जमीन मूळ बाजारभावापेक्षा अत्यंत कमी दरात खरेदी करण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. या प्रकरणामुळेच (पान २ वर)

### ➢ हायकोर्टाकडूनही दिलासा नाही

सत्र न्यायालयातील कारवाईला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी मुंबई उच्च न्यायालयात करण्यात आली होती. मात्र, हायकोर्टाने स्थगिती देण्यास नकार दिल्यामुळे आरोप निश्चितीची प्रक्रिया पुढे गेली. विशेष एमपीएमएलए न्यायालय काही कारणांमुळे १६ जानेवारीला उपलब्ध नसल्याने सुनावणी ६ फेब्रुवारीला ठेवण्यात आली होती. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी १३ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

# तीन पेक्षा अधिक मुलांचे पालकही निवडणूक लढवू शकणार!

## राजस्थान राज्य सरकारची मोठी घोषणा

वृत्तसंस्था । राजस्थान

**राजस्थानच्या भजनलाल शर्मा सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असलेली दोन मुलांची अट रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राजस्थानच्या भजनलाल शर्मा सरकारने राज्याच्या राजकारणात दूरगामी परिणाम करणारा ऐतिहासिक निर्णय घेण्याचे संकेत दिले आहेत.**

पंचायत आणि महानगरपालिका निवडणुकांसाठी लागू असलेली दोन मुलांची अट रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून, यामुळे तीन किंवा त्याहून अधिक मुले असलेले पालकही आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवू शकणार आहेत.

लोकशाहीमध्ये निवडणूक लढवण्याचा अधिकार कुटुंबातील मुलांच्या संख्येशी जोडला जाऊ नये, अशी स्पष्ट भूमिका सरकारने मांडली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील नागरिक, मागासवर्गीय आणि उपेक्षित समुदायांना मोठा राजकीय दिलासा मिळण्याची शक्यता आहे. आतापर्यंत या अटीमुळे अनेक सामाजिक (पान २ वर)



### ➢ भाजप आमदारांचे समर्थन

भाजप आमदार गोपाल शर्मा यांनी सरकारच्या निर्णयाचे समर्थन करत सांगितले की, पूर्वी लोकसंख्या नियंत्रणाची गरज वेगळी होती. आज परिस्थिती बदलली आहे. सध्याच्या काळात हा निर्णय योग्य असून सर्व जाती-धर्मातील लोकांना याचा फायदा होईल. सरकारने हा निर्णय विचारपूर्वक घेतला आहे.

● **विरोधकांचा आक्षेप** - या निर्णयावर विरोधी पक्षांकडून टीका होत आहे. पीसीसी प्रमुख गोविंद सिंह दोतासरा यांनी हा निर्णय लोकसंख्या नियंत्रण धोरणापासून दूर जाणारा असल्याचे म्हटले आहे. माजी मुख्यमंत्री भैरोंसिंग शेखावत यांनी दोनपेक्षा जास्त मुले असलेल्या व्यक्तींवर निवडणूक लढवण्यास बंदी घातली होती, असेही त्यांनी नमूद केले.

# उबाठा-मनसे युतीला तडा

वृत्तसंस्था । नाशिक

**महापालिका निवडणुकीत शिवसेना (उबाठा) आणि मनसेच्या युतीला निवडणुकीनंतर तडा गेला आहे.**

महापालिकेत भाजप स्पष्ट बहुमताने सत्तेत येणार असल्याने इतर सत्तेची पदे मिळवण्यासाठी पक्षांकडून आघाडी-युतीचे गणित सुरू झाले आहे. त्याचाच भाग म्हणून मनसेच्या एकमेव नगरसेविका मयुरी पवार यांनी शिंदेसेनेसोबत आपली सदस्यनोंदणी केली आहे. यामुळे स्थायी समितीवर भाजपचा एक सदस्य कमी होणार असला तरी,

**● शिवसेना शिंदे गटासोबत मनसेने गटनोंदणी केल्याने नवे समीकरण**

मनसेचे नाशिकमधील स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात येणार असल्याचे चित्र आहे. दरम्यान, स्थानिक पातळीवर विकासाच्या मुद्द्यावर पाठिंबा देण्यात आल्याचे मनसेचे जिल्हाध्यक्ष अंकुश पवार यांनी स्पष्ट केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. नाशिक महापालिका निवडणुकीत भाजपने १२२ पैकी ७२ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले आहे. त्यापाठोपाठ शिवसेनेने २६ जागा जिंकून दुसरा क्रमांक (पान २ वर)

## संपादकीय

### कालचा गोंधळ बरा होता

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात गुरुवारी निर्माण झालेली स्थिती अभूतपूर्व होती. हल्ली संसदेत अभूतपूर्वच होत असते. आज निर्माण झालेली स्थिती पाहिली की कालचा गोंधळ बरा होता असे म्हणायची वेळ येते. संसदीय परंपरांचे जे दाखले दिले जातात त्यांचा लवलेशही या गोंधळामुळे दिसत नाही. दिसतात ते फक्त टोकाचे मतभेद आणि विखारी शब्द. विचारधारा अथवा मुद्यांवर चर्चा होण्याचा काळ मागे पडला. आता केवळ उणीदुणी काढण्यासाठीच अधिवेशने होतात की काय असा प्रश्न पडतो. आताच्या अधिवेशनात गेले सहा–सात दिवस गदारोळच सुरू आहे. तोच कामकाजाचा मुख्य भाग झाला आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर पंतप्रधान लोकसभेत बोलणार होते. तथापि, सभागृहाचे कामकाजच स्थगित केले गेले. काँग्रेसच्या खासदारांकडून काहीतरी अघटित किंवा अनपेक्षित कृती होण्याची शक्यता असल्याची माहिती आपल्याकडे होती. ही मंडळी पंतप्रधानांच्या आसनापर्यंत जाणार होती. त्यांनी काही केले असते तर लोकशाही परंपरेला मोठा तडा गेला असता. म्हणून सभागृहाची प्रतिष्ठा राखण्यासाठी आपणच पंतप्रधानांना लोकसभेत न येण्याची विनंती केली होती असा खळबळजनक खुलासा सभापती ओम बिर्ला यांनी केला आहे. तर पंतप्रधान मोदी सभापतींच्या आडोशाने स्वत:चा बचाव करत आहेत, असा आरोप काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी केला आहे. पंतप्रधानांना इजा पोहोचवण्याचा प्रश्नच उदभवत नाही, असेही त्यांनी म्हटले. राज्यसभेत मात्र पंतप्रधानांनी जोरदार भाषण केले. दीड तासाच्या प्रदीर्घ भाषणात ते काही मुद्यांवर जरूर बोलले. तथापि, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकारांचे प्रमुख त्यांच्या टीकेच्या लक्ष्य स्थानी राहिले. वास्तविक एसआयआरपासून व्यापार करारापर्यंत आणि अमेरिकेसोबतच्या जाहीर न झालेल्या करार अटींपर्यंत अनेक मुद्यांचा मसाला विरोधी पक्षांकडे होता. तथापि, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी वेगळाच अजेंडा सेट केला. त्यांनी निवृत्त लष्करप्रमुख नरवणे यांच्या पुस्तकाचा दाखला देण्याचा आणि त्यातील मजकूर वाचण्याचा प्रयत्न केला. सरकारचे म्हणणे आहे की हे पुस्तक अद्याप प्रकाशित झालेले नाही. राहुल गांधी हे पुस्तकच पंतप्रधानांना भेट देणार होते, पण पंतप्रधान लोकसभेकडे आलेच नाहीत असा काँग्रेसचा दावा आहे. पंतप्रधान ज्या ठिकाणी बसतात त्या आसनाला बुधवारी काँग्रेसच्या महिला सदस्यांनी घेराव घातला होता असे सत्तापक्षाचे म्हणणे आहे. त्यामुळेच काही अनपेक्षित घडेल असे आपल्याला वाटले असे सभापतींचेही म्हणणे होते. प्रत्यक्षात असे काहीच नव्हते. विरोधी पक्षांना सभागृहात बोलू दिले जात नाही याचा विरोध विरोधी पक्षाच्या सदस्या करत होत्या हा काँग्रेसचा युक्तिवाद आहे. थोडक्यात दोन्ही बाजूंकडून परस्परांवर आरोप होत आहेत. ज्या पवित्र ठिकाणी लोकशाही सुरक्षित आहे, असे मानले जाते त्या ठिकाणी असणारे प्रतिनिधीच स्वत:ला सुरक्षित मानत नाहीत असा अर्थ यातून घ्यायचा का? राज्यसभेला ज्येष्ठांचे सभागृह म्हटले जाते. तेथेही हल्ली चर्चेचा स्तर तसा नसतो, जसा असायला हवा. पंतप्रधान आणि या सभागृहातील विरोधी पक्षनेते दोघेही वयाने आणि अनुभवाने ज्येष्ठ असूनही असे होत असेल तर अन्य सदस्यांकडून फारशा अपेक्षा करता येत नाहीत. या सगळ्या गदारोळाच्या आणि अजिबातच सौहार्दाच्या नसलेल्या वातावरणात पंतप्रधानांनी गुरुवारी उत्तर दिले. सध्या देशांतर्गत आणि जगात काय विषय आहेत आणि त्यावर किती गंभीरपणे चर्चा होणे गरजेचे आहे हे कुठेतरी हरवलेले दिसले. गोंधळात सगळ्याच विषयांना स्पर्श होणे अथवा न्याय मिळणे शक्यच नसते. युरोपीय संघासोबत झालेला करार असो वा अमेरिकेच्या अध्यक्षांनी सोशल मीडियाद्वारे केलेली टेरिफ कपातीची घोषणा असो या सगळ्यावर सर्वंकष चर्चा होणे अपेक्षित आहे.

# महापौरपदी मायादेवी परदेशी, उपमहापौरपदी ज्योत्स्ना पाटील

## जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपूते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली विशेष सभा

प्रतिनिधी धुळे

**महापौर व उपमहापौर निवडीसाठी शुक्रवारी (दि.६) सकाळी ११ वाजता महापालिकेच्या सभागृहात जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी भाग्यश्री विसपूते यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा पार पडली. या सभेत महापालिकेच्या अकराव्या महापौरपदी भाजपाच्या मायादेवी महादेव परदेशी तर उपमहापौरपदी ज्योत्स्ना प्रफुल्ल पाटील यांची निवड झाली.**



यावेळी आयुक्त नितीन कापडणीस, नगरसचिव मनोज वाघ यांच्यासह भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, एमआयएमचे सर्व ७४ नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते. शुक्रवारी (दि.६) झालेल्या विशेष सभेत महापौर व उपमहापौर निवडीसाठी हात उंचावून मतदान घेण्यात आले. या प्रक्रियेत भाजपच्या मायादेवी परदेशी व ज्योत्स्ना पाटील यांना प्रत्येकी ५० मते मिळाली.

शिवसेना–राष्ट्रवादी आघाडीच्या उमेदवारांना प्रत्येकी १३, तर एमआयएमच्या उमेदवारांना प्रत्येकी १० मते मिळाली. अपक्ष नगरसेवक रऊफ पठाण तटस्थ राहिले. त्यानंतर पिठासीन अधिकाऱ्यांनी निकाल जाहीर केला.

**मिरवणुकीतून जोरदार जल्लोष**

विजयाची घोषणा होताच भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत जोरदार जल्लोष केला. त्यानंतर नूतन महापौर व उपमहापौरांची खुल्या वाहनातून मिरवणूक काढण्यात आली.

या जल्लोषात पालकमंत्री जयकुमार रावल, आ. अनुप अग्रवाल, भाजप जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, महादेव परदेशी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. जेसीबी व क्रेनच्या साहाय्याने हार घालून सत्कार करण्यात आला.

### • शहर स्वच्छतेला प्राधान्य

**यावेळी बोलतांना महापौर मायादेवी परदेशी यांनी, जनतेने आणि पक्षश्रेष्ठींनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. पदभार स्वीकारल्यानंतर शहरातील स्वच्छता, नागरी सुविधा आणि मोकाट कुत्र्यांच्या समस्येला प्राधान्य दिले जाईल. मिळालेल्या संधीचे सोने आपण करू, अशी प्रतिक्रिया माध्यमांशी बोलतांना दिली.**

## जिल्हाधिकारी कार्यालयात आज वनहक्क पट्टे वाटप

प्रतिनिधी । नंदुरबार

**आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांच्या हस्ते रविवार, दि.८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात वनहक्क पट्ट्यांचे वाटप करण्यात येणार आहे.**

राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ तसेच नियम २००८ व सुधारीत नियम २०१२ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वैयक्तिक वनहक्क पट्टे वाटप मेळावा आयोजित करण्यात येत असल्याची माहिती आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार यांनी दिली. हा वनपट्टे वाटप कार्यक्रम रविवार, दि.८ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात पात्र आदिवासी व इतर पारंपारिक वननिवासी लाभार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक वनहक्कांचे अधिकृत पट्टे वितरित करण्यात येणार आहेत. कार्यक्रमास पात्र लाभार्थ्यांनी, वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार यांनी केले आहे.

## भागवत पाटीलची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी । धुळे

**तालुक्यातील कापडणे येथील भागवत रमेश पाटील या कुस्तीपटूची महाराष्ट्र केसरी निवड कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल भागवत पाटील याचा आ.राम भदाणे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.**

यावेळी नवजीवन संस्थेचे कोषाध्यक्ष अक्षय भदाणे, माजी उपसभापती विद्याधर पाटील, देवेंद्र पाटील, ललित बोरसे, भागवत पाटील, मनोहर पाटील, जितेंद्र पाटील, ज्ञानेश्वर पाटील, विशाल शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी आ.भदाणे यांनी मनोगत व्यक्त करत शुभेच्छा दिल्या.

# नवापुरात तलवारींची विक्री करणाऱ्या गुजरातमधील युवकास अटक

## • ३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत, नवापूर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी । नवापूर

शहरातील दिगंबर पाडवी सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बेकायदेशीरपणे तलवारी बाळगून त्यांची विक्री करणाऱ्या एका संशयितावर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत त्याच्याकडून ३ हजार रुपये किमतीच्या ६ लोखंडी तलवारी जप्त करण्यात आल्या असून अटक करण्यात आली आहे.




नवापूर शहरातील दिगंबर पाडवी सोसायटीकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्याच्या कडेला एक तरुण संशयास्पदरित्या तलवारींची विक्री करत असल्याची माहिती दि.५ रोजी दुपारी २.४० वाजेच्या सुमारास पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून रोहित राजकुमार लोहार (वय–२९, रा.कल्याणपूरा छापरा, कलोल, जि.गांधीनगर, गुजरात) याच्यावर कारवाई केली.

या कारवाईत त्याच्याकडून ६ लोखंडी तलवारी, ६ लाल रंगाचे मखमली (वेलवेट) कापड असलेले व सोनेरी लेस लावलेले पुठ्ठ्याचे कव्हर असा ३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल दिनकर चव्हाण यांच्या फिर्यादीवरून नवापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील, पोलीस उपनिरीक्षक विशाल सोनवणे, हवालदार किशोर वळवी, सुरेंद्र पवार, अतुल पानपाटील आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

## पान १ वरून

**पीओकेवरून पाकिस्तानला......**

पाकिस्तानने नेहमीच पीओकेला आपला प्रदेश मानले आहे, तर भारताने नेहमीच पीओकेला भारताचा अविभाज्य भाग मानले आहे. यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. पाकिस्तान या मुद्द्यावर जगभरात मदत मागतो. आता, अमेरिकेनेही पाकिस्तानच्या दुखण्याला स्पर्श केला आहे. अमेरिकेने भारताचा जुना नकाशा स्वीकारला आहे. वरून पाकिस्तानला हा मोठा धक्का मानला जात आहे. नकाशामध्ये जम्मू आणि काश्मीरसह पीओकेचे काही भाग भारताच्या सीमेत दाखवले आहेत.

**मुंबई महापौरपदासाठी......**

संजय घाडी यांना संधी देण्यात आली आहे. रितू तावडे या भाजपच्या ज्येष्ठ नगरसेविका आहेत. सन २०१२ मध्ये प्रभाग क्रमांक १२७ मधून विजय मिळवला होता. सन २०१७ मध्ये घाटकोपरमध्ये प्रभाग क्रमांक १२१ मधून पहिल्यांदा निवडून आल्या होत्या. यानंतर २०२५ च्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १३२ मधून विजय मिळवला आहे. त्यांनी मुंबई महापालिकेच्या शिक्षण समितीचे अध्यक्षपद भूषविले आहे. त्या महापौर पदाच्या प्रबळ दावेदार मानल्या जात होत्या. माझ्यासाठी हा ऐतिहासिक क्षण–रितू तावडे – मोठा आनंद आहे. भारतीय जनता पक्ष शिस्तबद्ध पक्ष आहे. वरिष्ठ जो निर्णय देतात तो सर्व कार्यकर्त्यांना मान्य असतो. माझ्यासाठी आजचा हा ऐतिहासिक क्षण आहे, अशी पहिली प्रतिक्रिया महापौर रितू तावडे दिली.

**आ.खडसेंना कोर्टाचा दणका......**

आ.खडसे यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता.या प्रकरणात ३ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई सत्र न्यायालयातील विशेष न्यायालयाने एकनाथ खडसे आणि त्यांच्या कुटुंबीयांचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळला होता. त्यानंतर आरोप निश्चितीचा मार्ग मोकळा झाला.

**शेतकरी कर्जमाफीबद्दल......**

यांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अर्थसंकल्प मांडतील आणि त्यानंतर योग्य तो निर्णय घेतला जाईल. शेतकरी कर्जमुक्तीबाबत अर्थसंकल्पात मर्यादित तरतूद होऊ शकते. मात्र, दिलेला शब्द सरकार नक्की पाळेल, असा विश्वास भरणे यांनी व्यक्त केला. इंदापूरची जनता हुशार आहे. भाषणांना किंवा प्रचारसभांना ती भुलत नाही. तालुक्याच्या विकासासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ चिन्हावरील सर्व उमेदवार निवडून येतील,फ असा ठाम दावा भरणे यांनी केला.

**उबाठा–मनसे युतीला......**

मिळविला आहे. शिवसेना उबाठा १५, राष्ट्रवादी काँग्रेस चार, काँग्रेस तीन, तर मनसे व अपक्ष असे प्रत्येकी एक नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे महापौर, उपमहापौरांसह स्थायी समिती अध्यक्षपद भाजपकडेच राहणार आहे. परंतु, स्थायी समिती सदस्यांसह विषय समित्यांसाठी विरोधकांनी फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. अपक्ष नगरसेवक मुकेश शहाणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर आता मनसेच्या एकमेव नगरसेवकाने शिवसेनेसोबत गटनोंदणी केली आहे. त्यानंतर महापालिकांच्या सत्तेची गणिते जुळविण्यासाठी भाजपने शिवसेनेला उपमहापौरपद देऊ केले आहे. त्याशिवाय शिवसेनेनेदेखील स्थायी समितीमध्ये टक्का वाढवून आणखी एक सदस्य पाठविण्यासाठी मनसेला सोबत घेतले आहे. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याकडे शिवसेनेने मनसेच्या एका सदस्याची गटनोंदणी केली. त्यामुळे सभागृहात नगरसेवकांचा आकडा २७ झाला आहे. तर, दुसरीकडे उबाठा आणि मनसे युतीला तडा गेला असून, मनसेचे नाशिकमधील स्वतंत्र अस्तित्व आता संपुष्टात आले आहे.

**तीन पेक्षा अधिक मुलांचे......**

कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी निवडणूक प्रक्रियेपासून दूर राहिले होते. तीन दशकांनंतर नियम रद्द – सुमारे ३० वर्षांपासून लागू असलेला हा नियम रद्द करण्यासाठी सरकारने पावले उचलली आहेत. विधानसभेत सादर केलेल्या सरकारच्या उत्तरानुसार, सध्याच्या सामाजिक व लोकसंख्याशास्त्रीय परिस्थितीत हा नियम अप्रासंगिक ठरत असल्याचे सरकारचे मत आहे. हा निर्णय मिशन २०२६ चा भाग असल्याचे मानले जात असून, ग्रामीण आणि शहरी राजकारणात व्यापक सामाजिक सहभाग वाढवणे हा यामागील उद्देश आहे.

**राज्यात ६० हून अधिक......**

यंत्रे अचानक बंद पडल्याने मतदारांचा खोळंबा झाला. खेर्डी जिल्हा परिषद गटातील पाच केंद्रांवर यंत्रे निकामी झाल्याने मतदारांना रांगेतच उभे राहावे लागले. शिरगाव येथे सकाळी दोन यंत्रे तासभर बंद होती, तर सावर्डे कॉलनीमध्ये सकाळी ९ वाजताच यंत्रात बिघाड झाला.कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र– रायगड जिल्ह्यातील अलिबाग (सहाण केंद्र) येथे मतदान सुरू होण्यापूर्वीच यंत्रात बिघाड झाला. सोलापूरच्या माळशिरस तालुक्यातील यशवंतनगर आणि सातारा जिल्ह्यातील कराडमधील चचेगाव येथेही सुरुवातीच्या काळात मतदान प्रक्रिया विस्कळीत झाली होती. सांगलीतील चिकुर्डे गटातही देवर्डे केंद्रावर काही काळ मतदान थांबले होते. छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज येथील मतदान केंद्रावर दोन यंत्रे बदलावी लागली. धाराशीव– तुळजापूर तालुक्यातील शिंदफळ गटातील शिरढोण येथे यंत्रातील बिघाडामुळे मतदानाला विलंब झाला.

## सोनगीर सुवर्णकार समाज अध्यक्षपदी अमित बागुल, सचिवपदी जितेंद्र बागुल

प्रतिनिधी । सोनगीर

सोनार समाजाचे आराध्यदैवत संत नरहरी महाराज यांची ७४० वी पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमात सोनगीर सोनार समाजाची नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात संत नरहरी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर समाजाची नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यात अध्यक्षपदी अमित बागुल, उपाध्यक्षपदी कल्पेश चव्हाण, सचिवपदी जितेंद्र बागुल, कार्याध्यक्षपदी हेमंत चव्हाण, संचालकपदी पराग सोनार, नितीन सोनार, रोहन वाघ, वैभव बागुल, कल्पेश सोनार, गौरव सोनार, निखिल सोनार, करण सोनार यांची निवड करण्यात आली. त्यानंतर समाजातर्फे सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

## नगरसेवकपदी निवडून आलेल्या हेमांगी सोनवणे, ऐश्वर्या सोनवणे यांचा सत्कार

प्रतिनिधी । अमळनेर

**दहिवद गावाचे सुपुत्र अंकुश सोनवणे यांच्या पत्नी हेमांगी सोनवणे आणि त्यांच्या कन्या ऐश्वर्या सोनवणे यांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत नगरसेवकपदी निवड झाल्याने दहिवद गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.**

या पार्श्वभूमीवर दहिवद विकास मंचच्या वतीने प्रतिभा देसले (पोलीस पाटील, दहिवद) यांच्या निवासस्थानी हेमांगी सोनवणे व ऐश्वर्या सोनवणे यांचा व त्यांच्या परिवाराचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गावातील व परिसरातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाला दिनेश पाटील (सदस्य, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, भारत सरकार), संगीता दिनेश पाटील (संचालिका, किमया अग्रो सोल्युशन कंपनी, पुणे), निलेश भदाणे (उपआयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका), सुभाष देसले (उपसभापती, पंचायत समिती अमळनेर), जयवंतराव पाटील (सरपंच), प्रविण माळी (उपसरपंच), देवानंद बहारे (सरपंच), प्रतिभा देसले (पोलीस पाटील, दहिवद), चंद्रकांत देसले (विस्तार अधिकारी, पं.स. अमळनेर), ईश्वर महाजन (चेअरमन, वि.का. सोसायटी, दहिवद), यशवंत भदाणे, दत्तात्रय देसले, राजेंद्र भदाणे, शिवाजी पारधी (गटनेता, ग्रामपंचायत दहिवद), तसेच अनेक ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अंकुश सोनवणे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. दहिवदचा गौरव सर्वत्र व्हावा, यासाठी प्रयत्नशील राहू. हेमांगी सोनवणे यांनी आपल्या भाषणात म्हटले, गावाने आमचा एवढ्या मोठ्याप्रमाणात सत्कार केला. ही आमच्या परिवारासाठी अभिमानाची बाब आहे. हा सन्मान आम्ही कधीही विसरणार नाही. ग्रामस्थांच्या प्रेमाचे ऋण आम्ही आयुष्यभर फेडू. तसेच दिनेश पाटील यांनीही आपल्या मनोगतात सांगितले की, गावातील जे सुपुत्र वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत आहेत, त्यांनी सामाजिक कामात सहभाग घेऊन आपल्या गावाचे ऋण फेडावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष देसले यांनी केले. तर आभार शिवाजी पारधी यांनी मानले. गावाच्या प्रगतीचा संदेश देणारा आणि ऐक्याची भावना दृढ करणारा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## देशाच्या पाया उभारणीत श्री विश्वकर्माच्या वंशजांचे मोठे योगदान : आ.अमोल पाटील

प्रतिनिधी । एरंडोल

**देशाच्या पायाभरणीत श्री विश्वकर्मांच्या वंशज यांचे योगदान सर्वात मोठे असून देशातील रस्ते पूल अशा मोठ्या विकासात्मक कामांमध्ये त्यांचे विशेष योगदान आहे. अशा या समाजासाठी मलाही माझे एक आमदार या नात्याने योगदान द्यावयाचे आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल पाटील यांनी केले.**



सुरुवातीला श्री विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे आमदार अमोल पाटील यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या समाजासाठी त्यांच्या हक्काची जागा व एक चांगले सुसज्ज व प्रशस्त सभागृहासाठी मी ४० लाखांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल पाटील यांनी केले. ते येथील श्री विश्वकर्मा सुतार समाज पंच मंडळ ट्रस्टतर्फे आयोजलेल्या श्री विश्वकर्मा जयंती उत्सव प्रसंगी अध्यक्ष पदावरून बोलत होते.

विचार पीठावर नगराध्यक्ष डॉ. नरेंद्र ठाकूर, माजी नगराध्यक्ष रवींद्र महाजन, उपनगराध्यक्ष सुनीता माळी, नगरपालिकेचे गटनेते प्रा. मनोज पाटील, नगरसेवक कृष्णा ओतारी, नगरसेवक अनिल महाजन, नगरसेवक रवींद्र महाजन, नगरसेवक नितेश चौधरी, नगरसेवक मयूर महाजन, नगरसेवक डॉ.एन डी पाटील, नगरसेवक अमोल तंबोली, दीपक पाटील, महेश देवरे, गोपाल पाटील, अतुल मराठे, नगरसेविका छाया दाभाडे, समाज सेवक आनंद दाभाडे, माजी नगरसेवक रुपेश माळी, आनंद दाभाडे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजातील ज्येष्ठ मान्यवर विनायक देवरे, निवृत्त पोलीस इन्स्पेक्टर रघुनाथ सुतार, निवृत्त पोलीस दिलीपसुतार, निवृत्त वायरमन नानाभाऊ देवरे, नगरपालिकेचे निवृत्त अभियंता लक्ष्मण शेलार आदी मान्यवरांचा आमदार अमोल पाटील यांचे हस्ते विशेष गौरव करण्यात आला. यावेळी सुतार समाजातर्फे नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा देखील विशेष सन्मान करण्यात आला. मनोज मिस्त्री यांच्यातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यशस्वीतेसाठी अध्यक्ष शिवाजी विश्वनाथ साळुंखे, उपाध्यक्ष दिलीप दत्तात्रय हिरे, सचिव दशरथ विनायक देवरे, खजिनदार दिलीप बाबुराव सुतार व सदस्य कैलास काळू सुतार, मनोज जगन्नाथ सुतार, प्रकाश दीपक सुतार, अमोल रवींद्र शिरसाठ, मनोज कैलास मिस्त्री, शिवाजी मिस्त्री, शरद रुले, दीपक सोनवणे, रवींद्र जाधव, प्रकाश आढळकर, कविता सुतार, ममता सुतार आदी महिला पदाधिकाऱ्यांनीही परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# राज्याला आर्थिक महासत्ता बनवण्यासाठी अर्थसंकल्पात क्रांतिकारी तरतुदी

## केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांची पत्रकार परिषदेत माहिती

प्रतिनिधी । जळगाव

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेला २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा भारताला २०४७ पर्यंत 'विकसित भारत' बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक ऐतिहासिक पाऊल आहे. हा अर्थसंकल्प प्रामुख्याने युवा शक्ती, महिला, शेतकरी आणि गरीब या चार स्तंभांवर लक्ष केंद्रित करतो. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी आणि राज्याला आर्थिक महासत्ता बनवण्यासाठी या अर्थसंकल्पात क्रांतिकारी तरतुदी करण्यात आल्या असून 'आत्मनिर्भर संरक्षण' आणि स्मार्ट सिटी विकासातून महाराष्ट्र देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा ठरेल, असे प्रतिपादन केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले.**



भाजप कार्यालय, जि.एम. फाउंडेशन येथे शनिवारी (दि.७) पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

पुढे बोलतांना ना.खडसे म्हणाल्या की, महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांसाठी केंद्राने यावर्षी विक्रमी निधी दिला आहे. रेल्वे प्रकल्पांसाठी १५,९४० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही तरतूद २००९-१४ च्या सरासरीच्या तुलनेत १३ पट अधिक आहे. राज्यातील १३२ रेल्वे स्थानकांचा 'अमृत भारत स्थानक' योजनेअंतर्गत कायापालट केला जाणार असून यात भुसावळ, जळगाव, नाशिक रोड, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे यांसारख्या प्रमुख स्थानकांचा समावेश आहे. तसेच मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या उपनगरीय रेल्वेमध्ये सुधारणा करण्यासाठी ५२,००० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून, मुंबईकरांसाठी २३८ नवीन स्वयंचलित दरवाजांच्या वातानुकूलित लोकल गाड्या ताफ्यात सामील केल्या जाणार आहेत.

राज्यातील हवाई कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अद्ययावतीकरणासाठी ७,००० कोटी आणि शिर्डी विमानतळावर ६४५ कोटी रुपयांचे नवीन एकात्मिक टर्मिनल उभारले जाणार आहे. कृषी उडान योजनेअंतर्गत नाशिक आणि पुणे विमानतळांचा समावेश केल्यामुळे उत्तर व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांचा माल जागतिक बाजारपेठेत पोहोचवणे सुलभ होईल. तसेच, मुंबई-पुणे प्रवास केवळ ४८ मिनिटांत आणि पुणे-हैदराबाद प्रवास २ तासांत पूर्ण करण्याचे हाय-स्पीड रेल्वेचे उद्दिष्ट राज्याच्या प्रगतीला वेग देणारे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ना.रक्षा खडसे यांनी पीएम इंटर्नशिप स्कीम (४, ७८८ कोटी) आणि स्किल इंडिया (२,८०० कोटी) च्या माध्यमातून तरुणांना प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. त्या पुढे म्हणाल्या की, १५,००० शाळांमध्ये कंटेंट क्रिएटर लॅब उभारल्या जातील आणि १०,००० गाईड्सना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. क्रीडा क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी भारतात क्रीडा साहित्याच्या उत्पादनाला प्रोत्साहन देऊन रोजगाराच्या नव्या संधी निर्माण केल्या जातील.

**आत्मनिर्भर संरक्षण आणि तांत्रिक क्रांती**

संरक्षण क्षेत्रातील स्टार्ट-अप्स आणि एमएसएमईसाठी दिलेल्या विशेष सवलतींचा थेट फायदा महाराष्ट्रातील पुण्यासारख्या तंत्रज्ञान केंद्रांना आणि ग्रामीण भागातील लघुउद्योगांना होणार आहे. सेमीकंडक्टर मिशन २.० अंतर्गत ४०,००० कोटी आणि भारताला 'ग्लोबल बायो-फार्मा हब' बनवण्यासाठी १०,००० कोटींचा निधी दिला असून, यामुळे राज्यातील आयटी हब आणि नवउद्योजकांना रोजगाराच्या अफाट संधी उपलब्ध होतील, असे त्यांनी यावेळी सांगितले.

कृषी क्षेत्रासाठी १,६२,६७१ कोटींची तरतूद असून जळगाव जिल्ह्यातील कापूस आणि केळी पिकांच्या प्रक्रियेसाठी नवीन ॲग्रो-क्लस्टर्सची घोषणा करण्यात आली आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक जिल्ह्यात मुलीचे विशेष शासकीय वसतिगृह आणि ग्रामीण भागात 'SHE Marts' सुरू केले जातील. औद्योगिक प्रगतीसाठी डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरला पालघर येथील वाढवण बंदराशी जोडले जाणार असून नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या शहरांचा 'सिटी इकॉनॉमिक रिजन' म्हणून विकास करण्यासाठी प्रत्येकी ५,००० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात

### मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

**जळगाव ।** डॉ.अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाच्या इतिहास विभाग आणि मूळजी जेठा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.९ ते १४ फेब्रुवारीदरम्यान मोडी लिपी परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी व शहरातील इच्छुक व्यक्तींकरिता ही कार्यशाळा नि:शुल्क असून मू.जे. महाविद्यालयाच्या ह्युमॅनिटीज बिल्डिंगमधील रूम क्रमांक १२ मध्ये रोज सकाळी ११ ते १२.३० या वेळेत ही कार्यशाळा होणार आहे. इच्छुक व्यक्तींनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मुकुंद गोसावींची ९ रोजी आकाशवाणीवर मुलाखत



**जळगाव ।** प्रसार भारतीच्या जळगाव आकाशवाणी केंद्रातून प्रसारित होणाऱ्या स्पंदन या सदरात सामाजिक व आरोग्य क्षेत्रात सेवारत मुकूंद गोसावी यांची सोमवार, दि.९ रोजी सकाळी ९.३० वाजता वैदेही नाखरे यांनी घेतलेली विशेष मुलाखत प्रसारित करण्यात येणार आहे. आकाशवाणी जळगाव केंद्रावरून तसेच १०२.१ एफएम वर आणि न्युज ऑन एयर या मोबाईल ॲपवर देखील ही मुलाखत प्रसारित करण्यात येणार आहे. गोसावी यांची ही मुलाखत समाजाला प्रेरणादायी असल्याने ती ऐकावी, असे आवाहन मुक्ती फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

### ज्येष्ठ नागरिकांनी कागदपत्रे सादर करावीत

**जळगाव ।** मुख्यमंत्री वयोश्री योजनासाठी जिल्ह्यातील तालुका आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत प्राप्त झालेल्या काही अर्जांमध्ये आधारकार्डवरील माहिती व बँक खात्याच्या तपशिलात तफावत आढळून आल्याने संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा होऊ शकलेली नाही. अशा लाभार्थ्यांची यादी संबंधित तालुका आरोग्य अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहे. तसेच ही यादी जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळ तसेच समाजकल्याण विभागाच्या वेबपेजवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. यादीतील ज्येष्ठ नागरिकांनी आपले आधारकार्ड व आवश्यक कागदपत्रे संबंधित तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय किंवा ९४२३१८४७६७ व्हॉट्सॲप क्रमांकावर सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## माता रमाई जयंतीनिमित्त पार पडले रक्तदान शिबीर

प्रतिनिधी । जळगाव

**येथील ३५८ ग्रुपच्यावतीने माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा अनेकांनी लाभ घेत रक्तदानसह आरोग्य तपासणी करुन घेतली.**



सुरुवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला आ.राजूमामा भोळे व पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी आ.राजूमामा भोळे, पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, ॲड.राजेश झाल्टे, पो.नि.सागर शिंपी आदींनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर पोलिस अधीक्षक रेड्डी, पो.नि.सागर शिंपी यांनी रक्तदान केले. त्यानंतर उपस्थित रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ३५८ ग्रुपचे अध्यक्ष अजय गरुड यांनी तर सूत्रसंचालन हरिश्चंद्र सोनवणे यांनी केले.

## गोदावरी नर्सिंगमध्ये हेपेटायटिस-बी लसीकरणाचा दुसरा टप्पा यशस्वी

प्रतिनिधी । जळगाव

**येथील गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात गुरूवारी (दि.५) रोजी बी.एस्सी. नर्सिंग प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांसाठी हेपेटायटिस-बी लसीकरणाचा दुसरा डोस यशस्वीरीत्या पार पडला.**




महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्या विशाखा गणविर, उपप्राचार्या जॅसिंथ धाया यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या लसीकरण कार्यक्रमात आरोग्य कर्मचारी सोनम कुदमाते आणि सुषमा सपकाळे उपस्थित होत्या.

या उपक्रमात जवळपास ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांची योग्य नोंदणी करून सुरक्षित व नियमानुसार लसीकरण प्रक्रिया राबवण्यात आली. संपूर्ण प्रक्रिया आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पार पडली. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.प्रियांका गाडेकर, प्रा.नेहा इंगळे, प्रा.रोहिणी हारगे आणि प्रा.सचिन पवार यांनी परिश्रम घेतले.

## नेव्हरे शिवारातील शेतातून लांबवले ट्रॅक्टर

प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील शिरसोली येथील नेव्हरे शिवारातील एका शेतातून अज्ञात चोरट्याने ट्रॅक्टर चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पूनमचंद हरी चव्हाण (वय ४५, रा.शिरसोली प्र.न.) यांची नेव्हरे शिवारातील गट क्रमांक ५३० मध्ये शेत असून गुरुवारी (दि.५) रोजी रात्री ८ ते ९:३० वाजेच्या सुमारास त्यांच्या मालकीचे निळ्या रंगाचे ट्रॅक्टर (क्र.एम.एच.१९, बी.जी. ९५०६) शेतात उभे केले होते. दरम्यान, अज्ञात चोरट्याने हा ट्रॅक्टर चोरून नेला.

शुक्रवारी (दि.६) रोजी रात्री उशिरा ही बाब लक्षात आल्यानंतर चव्हाण यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

पुढील तपास सहाय्यक फौजदार विजयसिंग पाटील करीत आहेत.

## ५ कोटी २३ लाखांच्या टंचाई आराखड्यास मंजुरी

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडून तयार करण्यात आलेल्या संभाव्य आराखड्यात यंदा ५१२ गावे होती. मात्र अतिवृष्टीमुळे यातील ६ गावे कमी होऊन ५०६ गावांचा अंतिम टंचाई आराखड्यात समावेश असून यंदा जिल्ह्यासाठी संभाव्य टंचाई आराखडा ९ कोटी ५४ लाखाचा प्रस्तावित होता. दरम्यान, शासनाकडून ५ कोटी २३ लाखांच्या टंचाई आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे.**

जिल्ह्यात परतीचा पाऊस चांगला झाला असला तरी योजनांची कामे अपुर्ण असल्याने यंदा पाणीटंचाईची संभाव्य गावे समाविष्ट करावी लागली आहे. मात्र ४५० पेक्षा अधिक योजना कार्यन्वीत झाल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे. परतीच्या पावसामुळे यंदा टंचाईच्या आराखड्यास कात्री लागली आहे.

जिल्हाभरात पाणीपुरवठा विभागाच्या अंतर्गत जलजीवन मिशनची कामे युध्दपातळीवर पुर्ण झाली तर आगामी वर्षात जिल्हा पाणीटंचाई मुक्त होण्याच्या मार्गावर आहे. यंदा टंचाई आराखड्यात ५०६ गावांचा टंचाई समावेश आहे. उपाय योजना म्हणून या गावांसाठी टँकर, विहीर अधिग्रहण, कूपनलिका, विंधन विहिरी आदी बाबींवर खर्चासाठी तरतुद प्रस्तावित आहे.

## बास्केटबॉल स्पर्धेत व्ही.पी. होले महाविद्यालयाच्या खेळाडूंचे वर्चस्व

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत आयोजित आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धा डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय येथे पार पडली. स्पर्धेत व्ही. पी. होले कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड फिजिकल एज्युकेशनच्या मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला.**

विजयी संघात कर्णधार सोनल हटकर, सोनी सोनवणे, मनिषा पवार, प्राची सावळे, रमीला तडवी, सीमा पवार या खेळाडूंचा समावेश होता. या यशाबद्दल संघाचा प्राचार्य डॉ.अशोक राणे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य केतन चौधरी, प्रा.प्रणव बेलोरकर, प्रा.अंजली बन्नापुरे, प्रा.प्रविण कोल्हे, प्रा.आकाश बिवाल, प्रा.सय्यद इरतकाझ, प्रा.आकाश धनगर उपस्थित होते.

## पोदार प्रेपमध्ये पालक, विद्यार्थ्यांनी घेतला हसत-खेळत व्यायामाचा अनुभव

प्रतिनिधी । जळगाव

**येथील पोदार प्रेपमध्ये पालक आणि विद्यार्थ्यांसाठी झुंबा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यात पालकांसह विद्यार्थ्यांनी संगीतमय वातावरणात हसत-खेळत व्यायामाचा अनुभव घेतला.**



कार्यक्रमाला प्राचार्य गोकुळ महाजन, वरिष्ठ मुख्याध्यापिका उमा पाटील यांची उपस्थित लाभली होती. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षके तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

या झुंबा सत्रातून पोदार प्रेपची समग्र विकास व आनंददायी शिक्षण ही संकल्पना पालकांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली.

> पोदार प्रेपमध्ये अशा उपक्रमांमुळे पालक, विद्यार्थी आणि शाळा यांच्यातील नाते अधिक दृढ होत असून, पोदार प्रेप हे केवळ शिक्षणाचे नव्हे तर आनंददायी अनुभवांचे केंद्र असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.

## अक्सानगरातील बुधवार बाजार तात्काळ बंद करा!

### रहिवाशांची निवेदनाद्वारे मागणी; आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । जळगाव

**मेहरुन परिसरातील अक्सानगरात भरणारा बुधवार बाजार तात्काळ बंद करण्यात यावा किंवा या बाजाराचे पर्यायी ठिकाणी स्थलांतर करण्यात यावे, अशी मागणी अक्सानगरातील रहिवाशांकडून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तातडीने कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा मार्ग अवलंबवावा लागेल, असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे.**

निवेदनात, दर बुधवारी भरविण्यात येणारा बुधवार बाजार रस्त्याच्या मधोमध बेकायदेशिररित्या भरविला जात असून या बाजारामुळे संपूर्ण रस्ता व्यापला जात असल्याने पादचारी नागरिक, दुचाकी, चारचाकी तसेच अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना या मार्गावरुन ये-जा करणे अशक्य होत आहे. या परिसरातील शाळकरी विद्यार्थ्यांना देखील अडचणी आणि गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. गर्दी, वाहतूक कोंडी आणि अतिक्रमणामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होवून अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्याचे नमुद करण्यात आले आहे. दरम्यान, हा बाजार तात्काळ बंद करण्यात यावा किंवा तो पर्यायी ठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावा, अशी मागणी देखील निवेदनात करण्यात आली आहे.

## शिव महापुराण हे मानवी जीवनातील क्लेश दूर करून शांती देणारा मार्ग : ह.भ.प देवदत्त मोरदे महाराज

### इंद्रप्रस्थनगरात शिव महापुराण कथेला भाविकांची अलोट गर्दी

प्रतिनिधी । जळगाव

**शिव महापुराण हे केवळ एक शास्त्र नसून, मानवी जीवनातील क्लेश दूर करून शांती देणारा एक मार्ग आहे. जसा गजानन महाराजांनी 'गण गण गणात बोते' या मंत्रातून चराचरात परमेश्वर पाहण्यास शिकवले, तसेच भगवान शिव हे त्या चराचराचे मूळ आहेत, असे प्रतिपादन देवदत्त मोरदे महाराज यांनी केले.**



श्री गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रगट दिनानिमित्त इंद्रप्रस्थ नगरातील योगिराज श्री गजानन महाराज बहुउदेशीय संस्थे (केशरबाग)च्यावतीने दि.५ ते ८ फेब्रुवारीदरम्यान, ह.भ.प. देवदत्त मोरदे महाराज यांच्या अमृतवाणीतून शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

पुढे बोलतांना ह.भ.प देवदत्त मोरदे महाराज म्हणाले की, भक्तीमध्ये जेव्हा स्वचा त्याग होतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने शिवाची प्राप्ती होते. शिव हे कल्याणाचे प्रतीक आहेत, असेही ते यावेळी म्हणाले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संतोष चव्हाण, सचिव गणेश शेळके, उपाध्यक्ष प्रवीण पाटील, समिती सदस्य योगेंद्र पवार, राजेंद्र बडगुजर, सतीश वाणी, प्रकाश शेवाळे, डॉ.सोपान पाटील आणि सतीश भोसले यांच्यासह परिसरातील मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अर्जदारांना कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

प्रतिनिधी । जळगाव

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळा अंतर्गत एनएसकेएफडीसी कर्ज योजनेंतर्गत २०२३ मध्ये ऑनलाईन कर्ज प्रस्ताव सादर केलेल्या अर्जदारांनी येत्या आठ दिवसांच्या आत आवश्यक मूळ कागदपत्रांसह महामंडळाच्या जळगाव कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.**

या योजनेअंतर्गत ८१ कर्ज प्रस्ताव ऑनलाईन नोंदविण्यात आले असून ८२ प्रस्तावांची पुढील कार्यवाही प्रलंबित आहे. मात्र, अद्याप अनेक अर्जदारांनी आवश्यक मूळ कागदपत्रे महामंडळाकडे सादर केलेली नाहीत. त्यामुळे प्रशासकीय कार्यवाही पूर्ण होऊन योजनेचा लाभ मिळण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. विहित मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास संबंधित ऑनलाईन कर्ज प्रस्ताव रद्द करण्यात येतील. तसेच कागदपत्रे सादर न करणाऱ्या अर्जदारांना कर्जाची आवश्यकता नसल्याचे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असेही महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# धरणगावात त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकरांना अभिवादन

## • निस्सिम त्यागाचे मूर्तिमंत प्रतीक माता रमाई; आर.डी. महाजन

प्रतिनिधी । धरणगाव

प्रज्ञासूर्य, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनप्रवासात खंबीर साथ देणाऱ्या, त्याग व संघर्षाचे प्रतीक असलेल्या सत्यशोधिका माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धरणगाव शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी नगराध्यक्षा लीलाताई चौधरी, नगरसेविका प्रमिलाताई शिरसाठ, आर.डी.महाजन, विनय भावे, दीपक वाघमारे, कांतीलाल पाटील, के.आर.वाघ, समीर भाटिया, गोपाल पाटील, हेमंत माळी, गोरखनाथ देशमुख, सूरज वाघरे, महेंद्र महाजन, नाना बागुल, नगरसेवक विलास महाजन, गुलाबराव मराठे, आनंद पाटील, बुट्या पाटील, सुजित वाघमारे, कॉन्ट्रॅक्टर मोहन महाजन, श्याम अहिरे, रवींद्र वखरे, बाळासाहेब जाधव, महेंद्र तायडे, वाल्मीक पाटील, नंदलाल महाजन, आप्पा मोरे, निलेश मोरे, निलेश पवार, अरविंद चौधरी आदींनी



माल्यार्पण करून अभिवादन केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा गौरव करताना सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजक्रांतीच्या वाटचालीत रमाई यांनी मौनात राहून अपार दुःख, उपेक्षा व संघर्ष सहन केला. गरिबी, आजारपण आणि सामाजिक अन्याय यांचा सामना करतानाही त्यांनी बाबासाहेबांच्या ध्येयधोरणांवर अढळ विश्वास ठेवून कुटुंबाचा भार समर्थपणे पेलला. त्यांच्या संयमशील स्वभावामुळे व त्यागमय जीवनामुळेच बाबासाहेबांना समाज परिवर्तनाचे महान कार्य अखंडपणे करता आले. स्त्रीशक्ती, मातृत्व, सहनशीलता आणि निःस्वार्थ त्याग यांचे जिवंत प्रतीक असलेल्या माता रमाई आंबेडकर यांचे जीवन आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आणि दीपस्तंभ असल्याचे यावेळी आर.डी. महाजन यांनी सांगितले. माता रमाई यांनी केवळ एका महापुरुषाच्या जीवन साथीदाराची भूमिका निभावली नाही, तर समाजपरिवर्तनाच्या लढ्यात स्वतःला झोकून देत एक आदर्श निर्माण केला. त्यांच्या जीवनकार्याची आठवण करून देणारी ही जयंती सामाजिक समता, न्याय आणि मानवतेच्या मूल्यांची जाणीव करून देते, असे गौरवोद्गार उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूरज वाघरे यांनी केले.

**या कार्यक्रमास विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्याम अहिरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राजेंद्र वाघ यांनी मानले.**

## संकष्ट चतुर्थीनिमित्त गणपतीला शेंदूरलेपन

प्रतिनिधी । फैजपूर

संकष्ट चतुर्थी निमित्त शहरातील गणपती वाडीतील जागृत उजवा सोंडेच्या गणपतीला पारंपरिक पद्धतीने शेंदूरलेपन करण्यात आले. सकाळी ६ वाजता अनंत नेहेते, नगरसेविका सुनीता नेहेते, डॉ. अमित कुलकर्णी आणि गोपाल अग्रवाल यांच्याहस्ते गणपतीला शेंदूरलेपन करून पूजा विधी पार पडली. यानंतर भक्तांनी पुष्पहार अर्पण केला आणि नैवेद्य अर्पण करत गणपतीचे दर्शन घेतले. धार्मिक विधीचे संचालन पुरोहित गुणवंत जोशी यांनी केले. दिवसभर भाविकांची मंदिरात गर्दी होती. गणपतीला दर संकष्ट चतुर्थीला शेंदूरलेपन करूनच पूजा विधी करण्यात येते, अशी अनेक वर्षांची परंपरा आहे. मंदिराचे विश्वस्त उमेश गुजराथी हे या परिसराची देखभाल करतात.

## थोडक्यात

### पलोड स्कूलमध्ये सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकांची भेट

**जळगाव ।** विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने विवेकानंद प्रतिष्ठान संचालित काशिनाथ पलोड पब्लिक स्कूलमध्ये आयोजित रस्ता सुरक्षा जनजागृती उपक्रमानिमित्ताने सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अश्विनी जोगदंड यांनी शाळेस सदिच्छा भेट दिली. उपक्रमांतर्गत शाळेच्या आवारातील फरशीवर प्रत्यक्ष रस्ता सुरक्षा आराखडा तयार करण्यात आला.

## ब्रह्माकुमारीज्‌तर्फे चैतन्य नवदुर्गा देवींच्या झांकीचे उद्घाटन

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा रोटरी महोत्सव–२०२६ च्या पार्श्वभूमीवर ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या वतीने साकारण्यात आलेल्या चैतन्य नवदुर्गा देवींच्या झांकीचे उद्घाटन अतिशय भक्तिमय व आध्यात्मिक वातावरणात संपन्न झाले. अध्यात्म, संस्कृती व मूल्याधिष्ठित जीवनाचा संदेश देणारी ही झांकी महोत्सवातील विशेष आकर्षण ठरली आहे.**

या झांकीचे उद्घाटन ब्रह्माकुमारी



मीनाक्षी दीदीजी यांच्या पावन हस्ते करण्यात आले. यावेळी अरुणभाई गुजराथी, पंकज बोरोले, रोटरी क्लबचे अध्यक्ष रितीन जैस्वाल, आशीष गुजराथी, नीता अग्रवाल तसेच चोपडा ब्रह्माकुमारी केंद्राच्या मुख्य संचालिका मंगलादीदी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून नवदुर्गा देवींच्या दिव्य स्वरूपाचे दर्शन घडविण्यात आले. नवदुर्गा देवींच्या विविध रूपांमधून शक्ती, श्रद्धा, संयम, करुणा, पवित्रता आणि आत्मबल यांचे प्रतीकात्मक दर्शन झांकीतून साकारण्यात आले होते. स्त्रीशक्तीचे दिव्य स्वरूप आणि आत्मिक जागृतीचा संदेश या झांकीतून प्रभावीपणे मांडण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या आध्यात्मिक व सामाजिक कार्याचे कौतुक केले. समाजात सकारात्मक विचार, मूल्यनिष्ठ जीवनशैली आणि आत्मपरिवर्तनाची नितांत गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. चोपडा रोटरी महोत्सवाच्या माध्यमातून अध्यात्म व संस्कृतीचा सुंदर संगम साधणारा हा उपक्रम नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## पुस्तक परीक्षणात अंजनी भावसारचा सन्मान

प्रतिनिधी । पारोळा

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने बुलढाणा येथे आयोजित राज्यस्तरीय पुस्तक परीक्षण स्पर्धेत अंजनी भावसार यांनी चौथा क्रमांक पटकावला. त्यांनी नाशिक विभागाचे प्रतिनिधित्व करत राज्यातील आठ विभागांतून प्रत्येकी पाच प्रमाणे निवडक ४० स्पर्धकांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून पुणे विभागातील तीन आणि मुंबई, नागपूर, कोल्हापूर व अमरावती विभागातील प्रत्येकी एक अशी एकूण सात स्पर्धकांना मागे टाकत ही मान्यता मिळवली.**

अंजनी भावसार यांनी प्रा. शरद चाफेकर लिखित व मनोविकास प्रकाशन पुणे प्रकाशित पाणीच पाणी चहूकडे या पुस्तकाचे परीक्षण केले. या यशामुळे शाळा, तालुका आणि जिल्हास्तरासह राज्यस्तरावर नाव झळकल्याने शिरपूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी डॉ. नीता सोनवणे, शिक्षण विस्तार अधिकारी यशवंत ठाकरे, केंद्र प्रमुख दीपक पाटील आणि मुख्याध्यापक वासुदेव चाचरे यांनी अंजनी भावसार यांचे विशेष कौतुक केले.

अंजनी भावसार हे राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श निवृत्त शिक्षक सदानंद धडू भावसार यांच्या कन्या असून, आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालय भोरखेडा, ता. शिरपूर शाळेचे उपशिक्षक सुरेश गुरुदास भावसार यांच्या पत्नी आहेत.

## काहूरखेडे जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांनी गिरवले व्यवहार ज्ञानाचे धडे

प्रतिनिधी । भुसावळ

**तालुक्यातील काहूरखेडे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि. ४ फेब्रुवारी रोजी बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे तसेच उपयुक्त वस्तूंचे स्टॉल लावून आपली कौशल्ये सादर केली.**

कार्यक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, सदस्य लतिका झांबरे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



कार्यक्रमास मुख्याध्यापिका उज्वला सुरवाडे, उपशिक्षक समाधान जाधव, उपशिक्षिका ममता तडवी, विद्यार्थ्यांचे पालक, ग्रामस्थ तसेच माध्यमिक विद्यालय बोहर्डी येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले पदार्थ विक्रीस ठेवून व्यवहारज्ञान, स्वच्छता, संघभावना व आत्मविश्वास यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. चाट, फरसाण, मिठाई, थंड पेये तसेच हस्तकला साहित्याचे स्टॉल विशेष आकर्षण ठरले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. सूत्रसंचालन उपशिक्षक समाधान जाधव यांनी केले. आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका उज्वला सुरवाडे यांनी केले. बाल आनंद मेळावा यशस्वीतेसाठी उपशिक्षिका ममता तडवी तसेच सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची गोडी निर्माण होऊन शालेय शिक्षणासोबत जीवनोपयोगी कौशल्ये विकसित करण्याचा उद्देश सफल झाल्याचे मत उपशिक्षक समाधान जाधव यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर, पालकवर्ग व ग्रामस्थांचे आभार मानण्यात आले.

## न्यू इंग्लिश स्कूल नशिराबादमध्ये कलारंग महोत्सव उत्साहात

प्रतिनिधी । नशिराबाद

**येथील न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिरात वार्षिक स्नेहसंमेलन कलारंग २०२६ चा प्रथम दिवस उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. विकास चौधरी होते. प्रमुख अतिथी म्हणून नशिराबादचे नगरसेवक व बांधकाम सभापती विकास पाटील, पाणीपुरवठा सभापती कीर्तिकांत चौबे, अर्थ समिती सभापती मनोज पाटील उपस्थित होते. मंचावर संस्थेचे कार्याध्यक्ष तथा नशिराबादचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष योगेश पाटील, उपकार्याध्यक्षा प्रमिला महाजन, उपाध्यक्ष विनायक वाणी, सचिव मधुकर चौबे, जेष्ठ संचालक जनार्दन माळी, राजेंद्र पाटील, भोजराज पाटील, डॉ. संदीप महाजन, ॲड. प्रदीप देशपांडे, जे. वाय. महाजन, संचालिका सुनिता पाटील, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुनिता बनसोडे, उपमुख्याध्यापक अनिल चौधरी, पर्यवेक्षक सुनिल पाचपांडे, समिती प्रमुख आर.ओ. चौधरी, आर. एल.पाचपांडे, एस.बी.रत्नापारखे, जे.एस. पगारे,प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रविण महाजन उपस्थित होते. यावेळी जिल्हास्तरीय स्पर्धेत यश मिळवलेल्या रोहनिश पाटील, रुचित माळी, देवांश कोलते व भूमेश पवार यांचा सत्कार करण्यात आला.

# म्हातारपणापर्यंत निरोगी राहण्यासाठी संतुलित आहार घ्या

## • गरम पाण्याने आंघोळ टाळा; निरोगी जीवनशैलीसाठी घरगुती आरोग्य टिप्स्

प्रतिनिधी । जळगाव

**हल्लीचं युग हे धावपळीचं आहे. या युगातील आधुनिक जीवनशैलीमुळे प्रत्येकाला आरोग्याच्या काही न काही समस्यांचा सामना करावा लागत आहे. अनियमित दिनचर्या, असंतुलित आहार यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. अशात तुम्हाला म्हातारपणापर्यंत निरोगी राहायचे असेल तर निरोगी जीवनशैलीसाठी संतुलित आहार घ्या आणि गरम पाण्याने आंघोळ टाळा, असा मौलिक सल्ला घरगुती जाणकारांनी दिला आहे.**

### पोटाचे आरोग्य जपा

व्यक्तीला जडणारे जवळपास ९० टक्के आजार हे पोटाच्या समस्येतून निर्माण होतात. त्यामुळे संतुलित आहार घ्यावा. कारण, चुकीच्या आहारामुळे ॲसिडिटीची समस्या निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पोट साफ राहील याची काळजी घेतली पाहिजे. तसेच भाताचे सेवन केल्यानंतर दूध पिऊ नये, यामुळे पोट दुखीचा त्रास होऊ शकतो.

### गरम पाण्यामुळे रोगप्रतिकारशक्ती होतेय कमी

आंघोळ करणे हे दिनचर्येतील महत्त्वाचे काम आहे. पण, आंघोळ करताना गरम पाणी टाळा. कारण, गरम पाण्याने आंघोळ केल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. आंघोळ करताना डोक्यावरुन गरम पाणी घेऊ नये. यामुळे डोळे कमजोर होतात.याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

### गव्हाच्या पोळ्यांबाबत काळजी घ्या

अनेकांच्या रोजच्या आहारात गव्हाच्या पोळ्यांचा समावेश असतो. परंतु गव्हाच्या पिठाबाबत विशेष काळजी घेतली पाहिजे. १५ दिवसांपेक्षा जास्त जुने पीठ वापरु नये.



### अति चहा पिणे टाळावे

बहुतांश जणांच्या दिवसाची सुरुवात ही चहाने होते. काही जण दिवसभरात अनेक कप चहा पितात. मात्र, असे करणे आरोग्यासाठी हानीकारक आहे. चहामुळे जवळपास ८० प्रकारचे आजार होतात. त्यामुळे चहा पिणे टाळावे. यासह साखरेपासून बनविलेले पदार्थ, बेकरी प्रोडक्टचे कामीत कमी सेवन करा.

### ॲल्युमिनियमच्या भांड्यात अन्न शिजविणे टाळावे

स्वयंपाक घरात अन्न शिजवण्यासाठी अनेक धातुंच्या भांड्यांचा वापर केला जातो. यात बहुतांश वेळा ॲल्युमिनियमच्या भांड्यांचा देखील वापर केला जातो. मात्र, ॲल्युमिनियमच्या भांड्यात अन्न शिजविणे किंवा खाने आजाराला निमंत्रण ठरते. जवळपास ४८ प्रकारे रोग नुसत्या ॲल्युमिनियमची भांडी वापरल्याने होतात. त्यामुळे ॲल्युमिनियमच्या ऐवजी मातीच्या भांड्यात, काशाच्या भांड्यात किंवा पितळाच्या भांड्यात स्वयंपाक करावा. तसेच स्वयंपाक झाल्यानंतर तो ४८ मिनिटांच्या आत खावा. उशीर केल्याने त्यातील पोषक तत्वे नाहीशी होतात.

### ➢ ज्वारीचे सेवन आरोग्यवर्धक

**आरोग्याच्या दृष्टीने ज्वारीचे सेवन फायदेशीर ठरते. ज्वारी ही पचनास हलकी असल्याने पचनक्रिया देखील सुरळीत राहते. यासह ज्वारीचे नियमित सेवन केल्याने अकाली वृद्धत्व लवकर येत नाही.**



### व्यसनामुळे अनेक गंभीर आजार

निरोगी आयुष्यासाठी व्यसन टाळले पाहिजे. व्यसनामुळे अनेक गंभीर आजार निर्माण होतात. गुटका, डुक्कराचे मांस, पिझ्झा, बर्गर, बिडी, सिगारेट, कोल्ड्रिंक यामुळे पोटातील मोठे आतडे सडतात. त्यामुळे या गोष्टी टाळाव्यात.

### जेवण झाल्यानंतर लगेच आंघोळ टाळा

काही लोक आंघोळीच्या आधी जेवन करतात आणि जेवण झाल्यानंतर लगेच आंघोळ करतात. असे करणे आरोग्यासाठी घातक ठरते. जेवणानंतर लगेच आंघोळ केल्याने पचनशक्ति कमजोर होऊन शरीर कमजोर होते. आंघोळ करताना कधीही झटकन डोक्यावर पाणी घेऊ नका. कारण, असे केल्याने अर्धांगवायु किंवा हृदयविकाराचा झटका येवू शकतो. त्यामुळे आंघोळ करताना सर्वात आधी पायावर त्यानंतर गुडघ्यावर, मांडीवर, पोटावर, छातीवर, खांद्यावर आणि नंतर डोक्यावर पाणी टाकून आंघोळ करावी.

### हेअर कलर करु नका

तरुण दिसण्यासाठी अनेक जण हेअर कलर करतात. हेअर कलर केल्याने डोळ्यांवर दुष्परिणाम होत दृष्टी कमी होते. तसेच प्रत्येकाने जेवणाच्या बाबतीत विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यानुसार, दुपारचे जेवण वेळेवर आणि पोटभरुन केले पाहिजे. तर रात्री हलका आणि मोजका आहार घ्यावा.

### उभे राहून पाणी पिणे टाळा

अनेक जण उभे राहूण पाणी पितात. उभे राहून पाणी पिल्याने टाच दुखण्याची समस्या निर्माण होते. तसेच नेहमी ताजे पाणी प्यावे. पिण्यासाठी विहिरीचे पाणी फार उत्तम. बाटलीबंद किंवा फ्रिजचे पाणी टाळावे. तसेच दूषित पाण्यामुळे यकृत, टायफाईड, पोटाचे विकार होतात. ही समस्या टाळण्यासाठी पाण्यात निंबूचे सेवन करणे लाभदायक ठरते. यासह जेवताना कधीही वरुन मीठ घेऊ नये. जेवनात वरुन मीठ घेतल्याने रक्तचाप आणि ब्लडप्रेशर वाढतो. तसेच शक्य असल्यास आहारात सैंधव किंवा काळ्या मिठाचा वापर करावा, आशा टिप्स दिल्या आहेत.

### लसूण आरोग्यासाठी लाभदायक

जेवणात लसूण हे आन्नाची चव तर वाढवतोच पण, आरोग्यासाठी देखील लसूण खूप लाभदायक ठरतो. लसणामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते तसेच हृदयविकाराचा धोका कमी होतो.

**(क्रमशः)**

### ➢ मद्य, कोल्ड्रिंकचे अतिसेवन घातक

**हल्ली जंक फुडच्या या युगात मद्य सेवन आणि कोल्ड्रिंकचे सेवन अनेक जण करातात. कोल्ड्रिंक तर लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत अनेकजण पितात. मात्र, मद्य आणि कोल्डिंकचे अतिसेवन आरोग्यासाठी घातक आहे. यामुळे हृदय रोगाचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या पदार्थांचे अतिसेवन टाळावे,असा काममंत्र घरगुती जाणकारांनी दिला आहे.**

# चाळीसगाव मार्केटमध्ये कांद्याचे दर कोसळले

प्रतिनिधी । चाळीसगाव

**चाळीसगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत सद्या नवीन कांद्याची आवक वाढली आहे. येथील नागदरोड स्थित कांदा मार्केटमध्ये बुधवारी शेतकऱ्यांनी जवळपास २०० वाहने कांदा विक्रीसाठी आणली होती. परंतु नवीन लाल कांद्याचे भाव कोसळले आहेत. नवीन लाल कांद्याला कमाल भाव १,२३० रुपये मिळाला आहे. आवक चांगली असून भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. भारत सरकाराने नुकताच अमेरिकेबरोबर केलेल्या करारामुळे आधीच शेतकरी नाखूष आहे. त्यात भारतात देखील शेतमालाला पाहिजे त्याप्रमाणात भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.**

येथील कांदा उपबाजार समितीत कांदा लिलावात मागील आठवड्याच्या जवळपासच नवीन चांगल्या कांद्याला १७०० रुपये भाव मिळाला होता. परंतु बुधवारी पाहिजे तसा भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा हिरमोड झाला आहे. चाळीसगाव कृषी उत्पन्न बाजार समिती ही जळगाव जिल्ह्यातील मुख्य बाजार समिती असून याठिकाणी कन्नड, नागद, भडगाव, पाचारो यासह अनेक



तालुक्यातून कांदा विक्रीसाठी येत असतो. कांदा विक्रीनंतर शेतकरी बांधवांना कांदा विक्रीची रक्कम त्याच दिवशी रोख स्वरूपात देण्यात येते. त्यामुळे येथील कांदा मार्केटने शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करुन, नाव झाले आहे. येथील कांदा मार्केटमध्ये आता शेतकऱ्यांनी साठवून ठेवलेला जुना कांदा विक्रीसाठी जवळपास बंद झाला आहे.

नवीन कांदा मोठ्याप्रमाणात विक्रीसाठी येत आहे. बुधवारी जवळपास २०० वाहने येथील नागदरोड येथील कांदा मार्केटमध्ये विक्रीसाठी आली होती. यातील कमी दर्जाच्या कांद्याला ३०० रुपये भाव मिळाला. तर त्यापेक्षा अधिक चांगल्या कांद्याला सरासरी ९५० रुपये भाव मिळाला. तर चांगल्या लाल कांद्याला १२३० रुपये भाव मिळाला. परंतु शेतकऱ्यांना १५०० ते २००० रुपयांपर्यंत भाव मिळावा, अशी अपेक्षा असल्यामुळे त्यांचा हिरमोड झाला आहे. सध्या मार्केटमध्ये मोठ्याप्रमाणात नवीन कांद्याची आवक आहे, मात्र भाव नसल्यामुळे शेतकरी इतर मार्केटमध्ये सुध्दा कांदा विक्रीसाठी जात असल्याचे दिसत आहे.